नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 10/09/2021 (शुक्रवार)
(सायंकाळ)

---

## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 5 कि. मी. अंतरावरील मौजा खानगाव शिवार येथे दिनांक 09/09/2021 चे 06.00 वा. दरम्यान फिर्यादीच्या चूलत भावाने फोन करून सांगीतले की, गं.भा शेवंताबाई रतन पटपूरीया (मृतक)वय 75 वर्ष रा. रानवाडी ता नरखेड या शौचास गेल्या असता त्यांचा नदीमध्ये पाय घसरून पाण्यात बुडून मरण पावल्या आहेत.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– अश्विन मधुकर खरपूरीया, वय 25 वर्ष, रा. खानगाव यांचे रिपोर्टवरुन पो. स्टे. काटोल येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार प्रभुदास दलाल मो. क्र. 9823970139 हे करीत आहे.

## नैसर्गिक विज पडुन मृत्यू

पो.स्टे. अरोली :– अंतर्गत मौजा तरोडी शिवार येथे दिनांक 09/09/2021 चे 17.15 वा. वाजता दरम्यान ग भा पुष्पा दुर्योधन बगडे वय 45 वर्ष रा तुमान या शेतात धानाचे पिकातील कचराचे निंदन्याचे काम करून धरी परत येत असतांना अचानक नैसर्गिक वीज पडल्याने त्या जागेवरच मरण पावल्या. 2) सौ बबीता अतिन गायकवाड वय 38 वर्ष रा तुमान, 3) सौ. सुनिता बाई रामदास कोंगे वय 40 रा तरोडी व 4) सौ प्रमीला घनश्याम घोडमारे वय 36 वर्ष रा तरोडी या विज पडल्याने गंभीर जखमी झाल्या. जखमी पैकी सौ बबीता अतिन गायकवाड व सुनिता रामदास कोगें यांना उपचाराकरीता डॉ कुकसे हॉस्पीटल अरोली येथे भरती केले असून सौ प्रमीला घनश्याम घोडमारे हिला उपचारा करीता रामटेक येथील सरकारी दवाखाना येथे पाठविले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– अनंत गायकवाड, वय 45 वर्ष, रा. तुमान यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. अरोली येथे कलम 174 जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सहायक फौजदार वरखडे मो न 9370031646 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर